**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार**
**पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२- २९४५१००१
**Email ID –**
**pro.cp.mbvv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक ३५५ दिनांक २२-१२-२०२१

# चार चाकी व दुचाकी वाहन चोरी करणा-या सराईत आरोपीतांना अटक - पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २८/११/२०२१ रोजी २०.०० वा. ते दि. २९/११/२०२१ रोजी १६.०० वा. चे दरम्यान श्री साई प्रकाश इंटरप्रायजेस कंपनी समोर, सुकाळा तलाव, वाकणपाडा, वसई फाटा, वसई (पु.), ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी यांनी मारुती सुझूकी कंपनीची इको कार क्रं.एम.एच.०१/ ए.पी. २१३९ ही पार्क करुन ठेवलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी केल्याबाबत फिर्यादी सुशिलकुमार हरीकृष्ण पांडे, वय-६२ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा. ए/६०१, साईरिवल डेल बिल्डींग, सेक्टर-७, तळोजा, नवी मुंबई यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांवर पेल्हार पोलीस ठाण्यात गु. रजि. नं. I ९३/२०२१ भा.दं.वि.सं. कलम -३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळावरील तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी नामे. १) रामजित नरेश भारती, रा. नवजिवन, वसई (पु.), ता. वसई, जि. पालघर, २) बाबा ऊर्फ अक्कु ऊर्फ आकाश प्रकाश पाटील, रा. नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर, ३) अक्षय प्रकाश पाटील, रा. नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर यांना दिनांक १९/१२/२०२१ रोजी अटक करून व एका विधी संघर्षित बालकांस ताब्यात घेवून त्यांचेकडून ०१ इको कार, ०२ ऑटो रिक्षा, ०८ मोटार सायकल असा एकुण- ५,३५,५००/- रुपये किंमतीचा ११ गुन्हयांतील चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तपासा दरम्यान नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

१) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ९३/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे, **(मुळ गुन्हा)**
२) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I १३०/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे.
३) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I १३१/२०२१, भा.दं.वि.सं. कलम-३७९ प्रमाणे.
४) वालीव पो.स्टे. गु.रजि.नं. I ८१३/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे.
५) वालीव पो.स्टे. गु.रजि.नं. I १२३७/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे.
६) वालीव पो.स्टे. गु.रजि.नं. I १३७२/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे.
७) वालीव पो.स्टे. गुन्हा रजि नं. I १२२७/२०२१ भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे.
८) वालीव पो.स्टे. गु.रजि.नं. I १२३१/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे .
९) वालीव पो.स्टे. गु.रजि.नं. I १२४३/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे.
१०)नालासोपारा पो.स्टे. गु.रजि.नं. I ५०१/२०२१, भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे.

११) काशिमिरा पो.स्टे. गु.रजि.नं. I ८६२/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे, पोउपनि/ सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, टी. जी. माने, पो.ना. टी. एस. चव्हाण, प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, बी. एस. गायकवाड, किरण आव्हाड यांनी पार पाडलेली आहे.

---ooo---